## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 23/01/2020 (गुरूवार)
## (दुपार)

---

### 02 वाहन चोर जेरबंद
### 08 दुचाकी वाहने जप्त
### स्थानिक गुन्हे शाखा.,नागपूर ग्रामीणची कार्यवाही

नागपूर ग्रामीण जिल्हयात पो.स्टे. खापरखेडा, सावनेर, कळमेश्वर हद्दीत सतत् होत असलेल्या दुचाकी वाहनाच्या चोरी संबंधात मा. पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री अनिल जिट्टावार यांना विशेष लक्ष पुरविण्याकरिता आदेशीत केल्याने श्री जिट्टावार यांनी विशेष पथक तयार करून दुचाकी वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पथक नेमले. आज दिनांक 23/01/2020 रोजी सदर पथकाला माहीती मिळाली की खापरखेडा बिना संगम बस स्टॅड जवळ 1) संजय विनायक भिमटे, वय 25 वर्ष, 2) वेदांत राजेश पराते, वय 19 वर्ष, दोन्ही रा. बिना संगम पो.स्टे. खापरखेडा हे फिरत आहे व त्यांचे जवळ एक पॅशन प्रो दुचाकी गाडी असुन ती गाडी चोरीची आहे. व या दोन्ही आरोपींनी भरपुर दुचाकी गाडया चोरी केलेल्या आहेत. या मिळालेल्या खात्रीशीर बातमीवरुन वरील दोन्ही आरोपीतांना सदर ठिकाणावरुन ताब्यात घेवुन त्यांचे जवळ असलेली एक काळया रंगाची हिरो पॅशन प्रो. गाडी तसेच इतर ग्रामीण व शहर भागामध्ये चोरी गेलेल्या दुचाकी वाहन बाबत विचारपुस केली असता त्यांनी नागपूर शहर हद्दीत विवीध पो. स्टे. हद्दीतुन दुचाकी वाहन चोरी केल्याचे सांगीतले. त्याचे जवळुन पो.स्टे नविन कामठी हद्दीतुन चोरून नेलेल्या तीन मोटर सायकल पो.स्टे. सदर हद्दीतुन दोन मोटर सायकल व पो.स्टे. जुनी कामठी, तहसिल व कोराडी हद्दीतुन प्रत्येकी एक मोटर सायकल अश्या एकुण आठ (08) मोटर सायकली याचे जवळुन हस्तगत करून नमुद आरोपी व जप्त माल पुढील कार्यवाही करिता पो.स्टे. नविन कामठी नागपूर शहर यांचे स्वाधीन केले.

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनीका राऊत यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार, पोउपनि सचिन मत्ते, सहा. पोउपनि. लक्ष्मीप्रसाद दुबे, पो. हवा. सुरज परमार, निलेश बर्वे, नापोकॉ शैलेश यादव, सत्यशिल कोठारे, पो.कॉ. प्रणयसिंग बनाफर, विरेंद्र नरड, राधेश्याम कांबळे व चालक सफौ साहेबराव बहाळे यांनी केली.



## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कळमेश्वर – दिनांक 21/01/2020 चे 12.15 वा. ते 23.30 वा. चे सुमारास पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत फिर्यादी यांची 16 वर्षीय अल्पवयीन मुलगी ही दुकानातुन खाऊ आणते म्हणुन घरून गेली होती. दरम्यान संशयीत आरोपी नामे– समीर कापसे, वय 19 वर्ष, रा. झेंडा चौक, राजीव नगर हिंगणा याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 363, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि अश्विनी बावचे 8551969100 या करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कन्हान :– दि. 20/01/2020 ते दि. 22/01/2020 चे 09:30 वा. चे सुमारास फिर्यादी यांची 17 वर्षीय मुलगी पिडीता ही कॉलेज मध्ये जात असतांना आरोपी नामे– राजवीर बंडुपात्र, वय 19 वर्ष, रा. सत्रापुर कन्हान याने पिडीतेचा पाठलाग करून तसेच आरोपीने पिडीतेच्या घरासमोर येऊन शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपी हा बळजबरीने पिडीतेच्या घरी जाण्याचा प्रयत्न करीत होता. आरोपीने पिडीतेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 354 (ड), 323, 504, 506 भादंवि. सहकलम 11(4), 12 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि सुप्रिया धुमाळ 8693888512 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर